# निळकंठराव शिंदे महाविद्यालयात आभासी पध्दतीने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**भद्रावतीः** स्थानिक निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयात आभाशी पध्दतीने दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. ही परिषद निळकंठराव शिंदे महाविद्यालय आणि सिद्धी फाउंडेशन आंध्र प्रदेश याच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. या परिषदेचे मुख्य पेट्रान भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे, संस्थेचे सचिव डॉ. कार्तिक शिंदे आणि संस्थेचे सहसचिव डॉ. विशाल शिंदे, चीफकन्वीनर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल. एस. लडके, नकेला फाउंडर अँड चेअरमन सिद्धी फाउंडेशन विशाखापट्टणम आंध्र प्रदेशच्या डॉ अरुणा कुमारी, फाउंडर अँड सी यु इंटिग्रिटी मीडिया पब्लिशर न्यू दिल्ली लंडनचे श्रीनिवास राव आणि कॉन्फरन्सच्या कन्व्हेनर प्रा. डॉ. अपर्णा धोटे उपस्थित होत्या. या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सची सुरुवात स्वागत गीताने




## देश विदेशातील विविध मान्यवरांचा सहभाग

तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या स्वागतांनो झाली.सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. एस. लडके यांनी या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सचे प्रास्ताविक करीत आयोजनाची भुमिका स्पष्ट केला. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.डिक्सन एडम घाना व साहित्यीक प्रकाशराव कोलाराम यु.एस.ए. यांनी महाविद्यालयात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स साठी शुभेच्छा देत अशा प्रकारचा कार्यक्रमामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्यात संशोधनाची वृत्ती जागृत होऊ शकते. अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांनी या दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स करिता उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच अशा प्रकारच्या कार्यक्रम पुन्हा आयोजित करण्याची ग्वाही दिली. त्यांनी विद्यार्थी व शिक्षक यांना नेहमी संशोधनात्मक वृत्ती ठेवावी व नवनवे संशोधन करावे. यातून देशाला समोर जाण्याकरिता हातभार लावावा असे आवाहान केले. या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सच्या पहिल्या सेशनमध्ये कीनोट एड्रेस डॉ.डिक्सन एडम घाना यांचे मार्गदर्शन व प्रेझेंटेशन झाले. तसेच डॉ. डब्ल्यू .बी. गुरुले नागपूर डॉ. साजिद अहमद भट कझाकिस्तान, डॉ. सुजित मेत्रे नागपूर ;साहित्यीक प्रकाशराव कोलाराम यु .एस. ए. डॉ. रिमझिम बोरा आसाम, डॉ. डी जयाराजन पुद्दूचरी डॉ. शुमेला शाहीद सायंटिस्ट न्यू दिल्ली, डॉ. एस. मेरी पुद्दूचरी आणि ए.श्रीनिवास राव यांनी उपस्थित सर्व संशोधक विद्यार्थी शिक्षक व सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर पेपर प्रेजेंटेशन सत्रात अध्यक्षस्थानी डॉ. दीपक तायडे नागपूर, यांच्यासह डॉ सुधीर हुंगे पोभुर्णा ,डॉ मनोज कुमार पटले गोंदिया आणि डॉ. एस ए शहा वरोरा आदि मान्यवर होते. कॉन्फरन्स ला दुसऱ्या सत्रात एकूण बत्तीस विद्यार्थी संशोधक व शिक्षकांनी पेपर प्रेझेंटेशन दिले. तसेच या कॉन्फरन्स करिता जगातील विविध देशातील एकूण तीनशे पन्नास जणांनी उपस्थिती दर्शविली. या कॉन्फरन्स मध्ये भारत देशासह घाना, यु.एस.ए. व कझाकिस्तान तसेच विविध देशातील संशोधक सहभागी झाले. या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये पुरस्कार फॉर शृजना २०२३ चे वितरण करण्यात आले. त्यामध्ये शैक्षणिक कार्य विविध विषयात संशोधन समाज उपयोगी योगदानाबद्दल तसेच पर्यावरणावर काम केल्याबद्दल विविध मान्यवरांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये विविध संशोधकांनी आपले पेपर प्रेझेंटेशन केले त्यामध्ये प्रथम बेस्ट पेपर प्रेझेंटेशन अवॉर्ड शिवानी बुरड, दुसरा अवॉर्ड रझा रमीज, तिसरा शिल्पा आणि डॉ. रवी तोमर यांना प्रदान करण्यात आला.

या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सचे संचालन प्रा. डॉ. अपर्णा धोटे व डॉ किरण जुमडे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रा. सचिन श्रीरामे यांनी केले.या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स करिता जगभरातील विविध देशातील संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स यशस्वी करण्याकरिता डॉ. जी. आर. बेदरे, डॉ. के. पी. जुमडे, प्रा. सचिन श्रीरामे , महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. (ता.प्र.)

Dr. L.S. Ladke
PRINCIPAL
N.S. Science & Arts College
Bhadrawati, Dist-Chandrapur

५